नि.दि.दा.क्र. ४८/२०२२
कुंभाऱ्या वै. १० –वि– बाहजऱ्या वै. ५
**नि.क्र. ३८**

**प्रतिवादींतर्फे साक्षीदार क्र. १ प्रतिवादी क्र. ४**
**सर तपास विद्वान अधिवक्ता श्री. एम. एच. वसावे यांचेमार्फत–**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नांव– दिलीप वोपाऱ्या पावरा
वय – ३४ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. कंज्यापाणी, ता. धडगांव, जि. नंदुरबार.

मी माझ्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ३८ वर दाखल केले आहे. त्यातील मजकुर मी सांगितल्याप्रमाणे व दिलेल्या माहीतीप्रमाणे लिहीलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. तो मला वाचून दाखविला. त्यावर मी वाचून व समजून माझी निशाणी सही केली आहे.

**सर तपास पुर्ण.**

**उलट तपास वादींतर्फे श्री. व्ही. ओ. पावरा यांच्या मार्फत –**

वादी व त्यांचे विद्वान अधिवक्ता हजर. वादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलट तपास १०.०२.२०२६ पर्यंत तहकूब

समक्ष
**स्वा/–**
**(भुषण शं. वाढई )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धडगांव
जानेवारी ३०, २०२६

समक्ष
**स्वा/–**
**(भुषण शं. वाढई )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धडगांव
जानेवारी ३०, २०२६

**उलट तपास वादींतर्फे श्री. व्ही. ओ. पावरा यांच्या मार्फत –**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नांव– **श्री. दिलीप वोपा–या पावरा,**

२. मी आज न्यायालयात दोन्ही प्रतिवादींतर्फे साक्ष देतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ बाहद–या हा साबलापानी ता.शहादा येथे राहतो. हे म्हणण खरे आहे की, त्याच्या सोबत माझा भाऊ तेरसिंग हा सुध्दा राहतो. हे म्हणण खरे आहे की, साबलापानी येथे सुध्दा अतिक्रमित जमीन आहे व ते तेथे अतिक्रमित जमीनीवर खेडुन खातात. हे म्हणण खरे आहे की, साबलापानी येथे प्रतिवादी क्र.१ व तेरसिंगच्या नावे वनपट्टे आहेत. हे म्हणण खरे आहे की, मी, वोपा–या, खालपा आणि उदया असे आम्ही कंज्यापानी येथे राहतो. हे म्हणण खरे आहे की, वादी हा आपल्या कुंटुबासह कंज्यापानी येथे राहतो. मला माझ्या शेताचा क्र. सागता येतो. तो ३२१ आहे. हे म्हणण खरे आहे की, सदरचा क्र. हा वनकुप क्र. आहे. हे म्हणण खरे आहे की, सदर कुप क्र. मध्ये इतर ही लोक खेडतात, तसे त्यामध्ये वादी सुध्दा खेडतो. मला मी खेडत असलेल्या वादशेताचा चतुर्सिमा सांगता येतील. पुर्वेला काश्या हुण्या हा खेडतो, पश्चिमेला नाला, उत्तरेला मोठा नाला व दक्षिणेला जंगल्या काल्या खेडतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितलेल्या चतुर्सिमा खोटया आहेत. हे म्हणण खरे आहे की, मी सांगितलेल्या चतुर्सिमे संबधाने कोणताही सक्षम अधिका–याकडुन दिलेला कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

३. हे म्हणण खरे नाही की, दि.१०/०६/२०२२ रोजी सरतपासात सांगितल्या प्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही आणि वादीनी मला कोणताही हरकत अळथडा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमची जमीन आम्हीच खेडुन खातो. प्रश्न वादी हा त्याचीच जमीन खेडतो. उत्तर त्याची जमीन पडीत आहे. हे म्हणण खरे नाही की, माझ्या जमीनीच्या उत्तरेला वादीची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा एकटा असल्याने त्याची जमीन बडकावण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आणि आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पूर्ण.**

समक्ष

Digitally signed by BHUSHAN SHANKAR WADHAI
Date: 2026.02.10 13:55:14 +0530

**(भुषण शं. वाढई )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धडगांव
फेब्रुवारी १०, २०२६

समक्ष

Digitally signed by BHUSHAN SHANKAR WADHAI
Date: 2026.02.10 13:55:20 +0530

**(भुषण शं. वाढई )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धडगांव
फेब्रुवारी १०, २०२६